# ५ संस्कृती

५.१ संस्कृती : व्याख्या आणि प्रकार
५.२ संस्कृतीचे वर्गीकरण
५.३ संस्कृतीचे घटक
५.४ संस्कृतीची वैशिष्ट्ये
५.५ संस्कृतीचे महत्त्व
५.६ स्वसमूह श्रेष्ठतावाद (Ethnocentrism)
५.७ संस्कृतीचे संकरण

## प्रस्तावना

संस्कृतीची संकल्पना ही गुंतागुंतीची आणि अस्पष्ट अशी आहे. संस्कृती हा शब्द अनेकदा वेगवेगळ्या स्वरूपामध्ये समाजशास्त्रज्ञाकडून आणि दैनंदिन जीवनामध्ये वापरला जातो. एखाद्या विशिष्ट समाजाचा जीवन जगण्याचा मार्ग अथवा पद्धती म्हणजे संस्कृती अशी व्याख्या सर्वसाधारणपणे केली जाते. समाजातील संस्कृती ही शिकून संपादित केली जाते. तिचे हस्तांतरण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे केले जाते. संस्कृतीच्या अस्तित्वामुळे मानव प्राणी हा इतर मानवतेर प्राण्यांपेक्षा वेगळा ठरत असतो.

संस्कृती ही संज्ञा सर्वांत प्रथम एडवर्ड टायलर यांनी १८७१ मध्ये वापरली. संस्कृती हा शब्द लॅटीन भाषेतील 'कल्चुरा '(cultura) या शब्दापासून घेण्यात आलेला आहे. 'कल्चुरा '(cultura) चा अर्थ 'वाढवणे', 'रुजवणे' असा होतो. आपण दैनंदिन जीवनामध्ये संभाषण करताना संस्कृतीचा उल्लेख उच्च स्तर किंवा उच्च अभिरूची या अर्थाने करतो. उदा., कला, संगीत, तत्त्वज्ञान अर्थात समाजशास्त्रज्ञ संस्कृतीचा विचार करताना व्यक्तींच्या व्यक्तिगत उच्च अभिरुचीच्या आधारे न घेता समाजामधील सहभागी असणाऱ्या सर्व सदस्यांच्या जीवनपद्धतीचा विचार केला जातो.

संस्कृती ही संज्ञा म्हणजे विविध समाजांमध्ये किंवा गटांमध्ये सदस्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धती होय. यामध्ये सामान्यपणे पोशाखाचे प्रकार, खानपानविषयक व्यवहार, भाषा, वर्तन पद्धती आणि शिष्टाचार, कामाचे प्रकार, धार्मिक प्रथा, मनोरंजक कला, कला प्रदर्शन, साहित्य, खेळ, वैज्ञानिक दृष्टिकोन, लिंगभाव अभिव्यक्ति इत्यादींचा समावेश होतो. संस्कृती ही प्रवाही असते. पिढ्यान्-पिढ्या, काही घटक समाविष्ट केले जातात, काही कायमचे काढून टाकले जातात, काहींची व्याप्ती वाढते, काहींची वर्गवारी पुन्हा केली जाते आणि सुधारणा केली जाते. यामुळे संस्कृती ही गतिशील बनते.

**उपक्रम – १**

संस्कृती ही समाजानुसार बदलत असते. प्रत्येक समाज किंवा वर्ग यांना वेगवेगळी संस्कृती आहे. सदरील संस्कृती काही वेळा एकमेकांवर प्रभाव पाडते आणि काही वेळा एकाकी असते. याची उदाहरणे शोधा.

## ५.१ संस्कृती: व्याख्या आणि प्रकार

### ५.१.१ व्याख्या

१. *एडवर्ड टायलर :* "संस्कृती ही अशी जटिल समग्रता आहे की, ज्यामध्ये ज्ञान, श्रद्धा, कला, नीतिमत्ता, कायदा, रितीरिवाज आणि समाजाचा एक सदस्य म्हणून मानवाने संपादन केलेल्या इतर क्षमता व सवयी यांचा समावेश होतो.

२. *ऑक्सफर्ड डिक्शनरी :* "विशिष्ट लोकांचे किंवा समाजाचे विचार, रितिरिवाज आणि सामाजिक वर्तणूक म्हणजे संस्कृती होय."

३. *ब्रॉनिस्लॉ मॉलिनॉस्की :* "ज्यांच्याद्वारे मनुष्य

त्याची उद्दिष्ट्ये साध्य करतो अशी मानवनिर्मित साधने आणि माध्यमे म्हणजे संस्कृती होय.

वरील व्याख्यांवरून, हे स्पष्ट होते की, संस्कृती ही संज्ञा विशिष्ट अर्थासाठी वापरली जाते व ती दैनंदिन वापरामध्ये वेगवेगळी असते. थोडक्यात, संस्कृती ही –

i. विचार करण्याची एक पद्धत, भावना, श्रद्धा

ii. एकूण लोकांचे जीवन जगण्याचा मार्ग

iii. संपादित वर्तन

iv. प्रत्येकाला त्याच्या वर्गाचा सदस्य म्हणून मिळालेला सामाजिक वारसा

v. वर्तनाचे प्रमाणीकरण करण्याचे तंत्र होय.

## ५.१.२ संस्कृतीचे प्रकार

संस्कृती ही दोन प्रकारांमध्ये विभागलेली आहे

* **भौतिक आणि अभौतिक संस्कृती**

**१. भौतिक संस्कृती :** भौतिक संस्कृती ही वस्तुनिष्ठ मानवनिर्मित गोष्टीनी बनलेली असते. मानवाने निर्माण केलेल्या ठोस आणि मूर्त वस्तूंचा समावेश भौतिक संस्कृतीमध्ये होतो. यामध्ये पोशाख, दागिने, संगणक, विमान, टेलीव्हिजन, मिसाईल, इतर गोष्टींचा समावेश होतो. भौतिक संस्कृती ही जीवनाचा दर्जा वाढवण्यासाठी गरजेची असते.





भौतिक संस्कृतीची उदाहरणे

**२. अभौतिक संस्कृती :** अभौतिक संस्कृती ही मानवाने घडवलेल्या विचार, कल्पना याच्याशी संबंधित आहे. अभौतिक संस्कृतीमध्ये अमूर्त आणि अप्रकट गोष्टींचा समावेश होतो. उदाहरणार्थ, नियम, प्रमाणके, मूल्ये, प्रतीके, ज्ञान, श्रद्धा, इत्यादी.

अभौतिक संस्कृती मनोज्ञ आणि प्रमाणात्मकता या दोनमध्ये विभागली गेली आहे. मनोज्ञ संस्कृतीमध्ये आपल्या आसपासच्या घटना समजून घेणे आणि त्याचा अर्थ लावणे याचा समावेश होतो. उदा., कल्पना, ज्ञान, श्रद्धा इत्यादी. तर प्रमाणात्मकतेच्या पैलूमध्ये चालीरीती, रितिरिवाज, परंपरा आणि कायदे यांचा समावेश होतो. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक वर्तनाला मार्गदर्शन करणारी मूल्ये व नियम यांचा समावेश होतो.

संस्कृतीचे भौतिक संदर्भ खूप वेगाने बदलत असतात. आधुनिक बनण्याच्या प्रक्रियेमध्ये नवीन जगण्याच्या पद्धतींचा स्वीकार करणे समाजामधील सदस्यांना त्यामानाने सोपे असते. नवीन फॅशन, नवीन तंत्रज्ञान हे स्वीकारणे सोईस्कर असते. दुसऱ्या बाजूला, अभौतिक संस्कृती ती अमूर्त स्वरूपामध्ये असल्यामुळे बदलणे आणि तिचा स्वीकार करणे हे अतिशय अवघड असते. ज्ञान, कल्पना, श्रद्धा ह्या समाजामध्ये शतकानुशतके रुजलेल्या असतात. त्यांच्यामधील बदल, तो समाज किंवा समाजाचा

विशिष्ट भाग स्वीकारत नाही. अभौतिक संस्कृतीचे पैलू बदलण्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये विरोध केला गेला जातो.

**सांस्कृतिक गतिमंदता :** जेव्हा भौतिक संस्कृती अभौतिक संस्कृतीपेक्षा वेगाने बदलते तेव्हा कालांतराने या दोन्हींमध्ये दरी निर्माण होते. यालाच सांस्कृतिक गतिमंदता असे म्हणतात.

**उपक्रम – २**

तुमच्या सभोवताली होणाऱ्या सांस्कृतिक बदलांचे निरीक्षण करून सांस्कृतिक गतिमंदतेची उदाहरणे ओळखून त्याची यादी करा.

## ५.२ संस्कृतीचे वर्गीकरण

१. **उच्च संस्कृती :** उच्च संस्कृतीचा अर्थ उच्च दर्जाच्या सांस्कृतिक निर्मितीशी संबंधित आहे. मानव निर्मितीचे हे उच्च दर्जाचे प्रतीक समजले जाते. अनेकांच्या मते, इतर संस्कृतीच्या प्रकारांपेक्षा उच्च संस्कृती यातील कलात्मक मूल्यामुळे श्रेष्ठ किंवा उच्च समजली जाते. उदा., युरोपियन देशातील मोझार्ट, बीथोवेन यांचे संगीत किंवा भारतातील भीमसेन जोशी, हरिप्रसाद चौरसिया, रवि शंकर यांचे संगीत होय किंवा शेक्सपिअर यांचे साहित्य.

२. **लोकसंस्कृती :** ही सर्वसामान्य लोकांशी संबंधित व प्रामुख्याने औद्योगिक पूर्व समाजातील संस्कृती होय. ही संस्कृती अस्सल/अधिप्रमाणित समजली जाते. स्रिनाती यांच्या मते, या संस्कृतीकडे कला म्हणून बघितले गेले नसले तरी त्याचे वेगळेपण मान्य करून त्याचा आदर केला जातो. लोक संगीत, लोककथा ही लोकसंस्कृतीची उदाहरणे होत. ही लोकसंस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केली जाते. पंजाबमधील भांगडा, महाराष्ट्रातील लावणी किंवा उत्तर प्रदेशमधील नौटंकी ही याची उदाहरणे होत.

३. **जन संस्कृती :** लोकसंस्कृती ही औद्योगिक पूर्व काळाचे वैशिष्ट्य आहे. जनसंस्कृती हे औद्योगिक समाजाचे वैशिष्ट्य आहे. जनसंस्कृती ही प्रसारमाध्यमांच्या आधारे उदयास येते. उदा., लोकप्रिय सिनेमा, दूरचित्रवाणीवरील लोकप्रिय मालिका, पॉप संगीत.


४. **लोकप्रिय संस्कृती :** लोकप्रिय संस्कृतीमध्ये मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य लोकांना प्रिय असणाऱ्या सांस्कृतिक घटकांचा समावेश होतो. अर्थात यामध्ये त्या सांस्कृतिक घटकासंबंधी विशेष कौशल्य असल्याचा दावा केला जात नाही. उदा., स्टारवॉर्स, टायटॅनिक, हॅरी पॉटर कादंबरी, चांदोबा, छोटा भीम इत्यादी.

५. **उपसंस्कृती :** उपसंस्कृती म्हणजे असे गट की ज्यामध्ये एकमेकांबरोबर अनेक गोष्टी समान असतात. पण हे गट इतर गटांपासून वेगळे काढता येतात. उदा., विविध धार्मिक गट किंवा वांशिक गट किंवा युवा गट यांची संस्कृती.

## ५.३ संस्कृतीचे घटक

१. **प्रतीके :** प्रत्येक संस्कृतीमध्ये अनेक प्रतीके असतात. ही प्रतिके विशिष्ट गोष्टीचे निर्देशक असतात आणि बहुतांशी वेळेला ही प्रतीके काही भावना व प्रतिक्रियांना उद्युक्त करतात. समान संस्कृती असणाऱ्या व्यक्ती एखाद्या वस्तूला किंवा हावभावाला, आवाजाला किंवा एखाद्या प्रतिमेला विशिष्ट असा अर्थ लावतात. उदा., सध्या मोबाइलच्या जगतात स्वतःला व्यक्त करण्यासाठी किंवा आपल्या भावना पोहोचवण्यासाठी emojis/smiley याचा उपयोग केला जातो. याच्यामार्फतच बहुतांश वेळेस संदेश पाठवले जातात. त्याचप्रमाणे संपूर्ण देशाचे राष्ट्रीय प्रतीक म्हणून आपल्याला भारतीय राष्ट्रध्वजाकडे बघता येते. आणखी एक

उदाहरण घ्यायचे झाले तर आपल्या दैनंदिन जीवनात रस्त्यावरील सिग्नल हे वाहतूक नियंत्रित करण्यासाठी वापरलेली प्रतीकेच आहेत. काही प्रतीके भौतिक स्वरूपाची असतात. एका विशिष्ट संस्कृतीतील लोक समान प्रतीके वापरत असल्याने व्यक्तीमधील व गटातील आंतरक्रिया सोप्या होतात.



प्रतीके

**२. भाषा :** शब्दाला समुच्चय किंवा समान अर्थ असणारे विचार म्हणजे भाषा होय. एका विशिष्ट समाजामध्ये विशिष्ट परिस्थितीत समान भाषा वापरली जाते. भाषेमध्ये विविध आवाजांचे प्रकार, शब्द, वाक्यरचना असतात व या सगळ्यांना समान असा अर्थ असतो. भाषा हे प्रामुख्याने संपर्काचे माध्यम असते. तसेच एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे संदेश पोहोचवण्याचे काम भाषा करते. वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये वेगवेगळी भाषा वापरलेली असते. थोडक्यात, भाषा ही विविध गुंतागुंतीच्या क्रिया एकमेकांपर्यंत पोहोचवण्याचे माध्यम आहे. भाषेच्या माध्यमातूनच संस्कृतीची वृद्धी होत असते. प्राण्यांना विशिष्ट भाषा नसल्यामुळे त्यांची संस्कृती देखील विकसित होत नाही. थोडक्यात, भाषा ही संस्कृतीचा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे.

**हे तुम्हांला माहीत आहे का?**

उत्तर तुर्कस्तानातील काळ्या समुद्राजवळील गावकऱ्यांनी जोपासलेल्या पक्ष्यांच्या भाषेची गोष्ट – तुर्कस्तानामधील काळ्या समुद्राच्या किनाऱ्यावर एका दुर्गम डोंगराळ खेड्यामध्ये आजही गावकरी पक्ष्यांच्या शिट्टीच्या आवाजाच्या माध्यमातून एकमेकांशी संवाद साधतात. त्याला ते पक्ष्यांची भाषा असे संबोधतात. केवळ एकमेकांना शुभेच्छा देण्यापुरती ही भाषा न वापरता अनेक महत्त्वाचे व्यवहार व निरोप देण्यासाठी ही भाषा वापरली जाते. या गावाचे नाव 'कुस्कोय' असून या गावातील शेतकरी चहा, मळा, बीट व इतर धान्य पिकवतात.

या गोष्टीसाठी पुढील लिंकला भेट द्या.

Weblink: https://www.youtube.com/watch?v=mQmF7kbOrmE

**३. ज्ञान :** ज्ञान हा संस्कृतीचा महत्त्वाचा घटक आहे. ज्ञानाच्या साहाय्याने व्यक्ती आपल्या आसपासच्या परिस्थितीशी जुळवून घेतात. ज्ञान दोन प्रकारचे असते. प्रत्यक्ष ज्ञान जे कोणाच्याही मध्यस्थीशिवाय मिळणारे असते. याउलट अप्रत्यक्ष ज्ञान हे एखाद्या मध्यस्थाद्वारे मिळत असते.

आपल्या दैनंदिन जीवनात विविध अनुभवांच्या मार्फत आपण व्यावहारिक ज्ञानदेखील मिळवत असतो. हे ज्ञानाचे सर्व प्रकार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असतात. एखादी पिढी त्या त्या सामाजिक परिस्थितीनुसार ज्ञानाची निर्मिती करते व ते ज्ञान पुढच्या पिढीकडे सोपवते. पुढची पिढी बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार त्या ज्ञानात भर घालून किंवा बदल करून त्या पुढच्या पिढीकडे हस्तांतरित करते. अशा पद्धतीने प्रत्येक संस्कृतीतील ज्ञानाची वृद्धी होते.

**४. मूल्य आणि श्रद्धा :** मूल्य आणि श्रद्धा हे संस्कृतीचे आणखी दोन महत्त्वाचे घटक आहेत. प्रत्येक समाजानुसार त्यातील संस्कृती बदलत जाते. तसेच त्याची मूल्येही बदलत जातात. काय योग्य किंवा अयोग्य, काय चांगले किंवा वाईट इत्यादीबाबत एखाद्या समाजाच्या सदस्यांनी निश्चित केलेल्या सामूहिक संकल्पना म्हणजे मूल्ये होय. काही मूल्ये हे आपल्याला आनुवंशिकतेने/ परंपरेने मिळतात. थोडक्यात, विशिष्ट सांस्कृतिक मूल्याचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण होत असते. थोडक्यात, मूल्ये ही समाजातील सदस्यांनी निश्चित केलेले काही मापदंड असतात. प्रत्येक समाजाची स्वतःचीही मूल्ये असतात तसेच काही मूल्ये सार्वत्रिक असतात.

लोकांनी सत्य म्हणून स्वीकारलेली कल्पना किंवा विधाने म्हणजे श्रद्धा होय. मूल्ये आणि श्रद्धा हे दोन्हीही आपल्या नैतिक विश्वाचा भाग असतात. संस्कृतीचे सदस्य हे दोन्हीही घटक कुटुंबाकडून, शिक्षण व्यवस्थेतून किंवा धार्मिक संस्थांकडून शिकत असतात.

**५. नियमने :** नियमने म्हणजे एखाद्या समाजातील सदस्यांनी कशा प्रकारे वर्तन करावे या विषयीचे नियम होत. काही नियम आपण काय करू नये याविषयीचे मार्गदर्शन करतात, तर काही नियम समाजात वावरत असताना कशा प्रकारे वागावे हे सांगतात. बहुतांशी नियम हे सर्वांना समान लागू पडतात. तर काहीच नियम विशिष्ट संस्कृतीला धरून असतात.

सामाजिक नियमनांचे दोन भागांत वर्गीकरण करता येते:

१. लोकरिती २. लोकनीती.

लोकरिती या त्यामानाने सौम्य असतात व सौम्यपणे समाजातील व्यक्तींवर लादल्या जातात. याउलट लोकनीती या जास्त कठोरपणे पाळल्या जातात. खाण्याच्या वेळा, खाण्याच्या वेळी पाळले जाणारे शिष्टाचार, भोजन बनवण्याच्या पद्धती, बोलण्याच्या पद्धती आणि दैनंदिन व्यवहारातील शिष्टाचार इत्यादी लोकरिती या रूढीपरंपरागत आलेल्या वर्तन पद्धती होय. थोडक्यात एखाद्या समूहाच्या दैनंदिन व्यवहारातील रूढीपरंपरागत आलेल्या, रोजच्या जीवनात अंगवळणी पडलेल्या सवयी म्हणजे लोकरिती होय. तर लोकनीती या अधिक गंभीर पण अनौपचारिक रितीने पाळण्यात आलेल्या वर्तन पद्धती होय. उदाहरणार्थ, विवाहाचे नियम असणाऱ्या लोकनीतीचे उल्लंघन केल्याने सामाजिक व्यवस्थेला गंभीर धोका पोहोचू शकतो. लोकरिती व लोकनीती हे संस्कृतीचे मूलभूत आधार आहेत. यांच्यामुळेच विशिष्ट संस्कृतीचे आकलन होण्यास मदत होते. हे इतर कुठल्याही कायदेशीर नियमापेक्षा देखील महत्त्वाचे मानले जातात.

## ५.४ संस्कृतीची वैशिष्ट्ये

**१. संस्कृती शिकावी लागते :** संस्कृती ही जैविक वारशातून मिळत नाही तर ती सामाजिकरणाच्या प्रक्रियेद्वारे प्रत्येक सदस्य शिकत असतो. सांस्कृतिक गोष्टी शिकण्याची प्रक्रिया ही प्रतीकात्मक आंतरक्रियेतून घडत असते. म्हणजे प्रतीके, हावभाव यांतून संस्कृती शिकली जाते. ती आपल्याला आनुवंशिकतेतून मिळत नाही तर समाजात वावरत असताना आलेल्या अनुभवांतून शिकली जाते. प्रत्येक संस्कृतीचे सदस्य इतरांबरोबरच्या देवाण-घेवाणीतून काही आदर्श वर्तन पद्धती शिकत असतात व त्यातूनच त्यांचे जीवन घडत असते. भावी पिढी ही आदर्श वर्तन पद्धती शिकतात व यातूनच भावी पिढीमध्ये संस्कृती अंगीकारली जाते.

**२. संस्कृती ही अमूर्त असते :** संस्कृती ही समाजातील व्यक्तीच्या विचारातून किंवा त्यांच्या

सवयीतून दिसते. काही प्रमाणात त्यांच्या आचरणातून दिसते. थोडक्यात, आपण संस्कृती बघू शकत नाही, तर ती व्यक्तीच्या वर्तनातूनच अनुभवली जाते. या वर्तन पद्धतीमध्ये काही विशिष्ट रचना दिसते. त्याला आपण संस्कृती म्हणतो.

**३. संस्कृती ही सामूहिक असते :** संस्कृती ही मानवनिर्मित असली तर ती कोणा एका व्यक्तीच्या मालकीची नसते. एखादी संस्कृती तेथील भौगोलिक परिस्थितीतून, त्या समाजाच्या भूतकाळातून, तेथील लोकांच्या श्रद्धा आणि मूल्यांमधून तसेच त्यांच्या समृद्ध वारशातून जन्माला आलेली असते. त्या समाजाचा भाग म्हणून सर्वच व्यक्ती त्या संस्कृतीचा भाग बनतात. त्यांची भाषा व शिष्टाचार समान असतात आणि म्हणूनच संस्कृती सामूहिक असून वैयक्तिक नाही असे म्हटले जाते.

**४. संस्कृती ही मानवनिर्मित असते :** संस्कृती ही मानवाच्या सामाजिक आंतरक्रियेमधून निर्माण होते. ती आपोआपच उदयास येत नाही. त्यामुळेच संस्कृतीचे अस्तित्व त्या समाजाच्या अस्तित्वावर अवलंबून असते. ती नैसर्गिक नसून मानवनिर्मित आहे.

**५. संस्कृती आदर्शात्मक असते :** प्रत्येक संस्कृतीमध्ये विचार व नियमने असतात. हे विचार आणि नियमने नेहमीच आदर्श स्वरूपाची असतात. समाजातील आदर्श वर्तन पद्धती व नियम तसेच बौद्धिक, कलात्मक आणि विविध सामाजिक आदर्शांची एकत्रित बांधणी म्हणजे संस्कृती होय. अशा प्रकारच्या आदर्श संस्कृतीलाच प्रोत्साहन दिले जाते.

**६. संस्कृती ही हस्तांतरित केली जाते :** पालक, शिक्षक, धर्मगुरू, जनसंपर्काची साधने आणि समाजातील इतर सदस्य आदर्श अशा वर्तन पद्धती एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे हस्तांतरित करत असतात. अर्थात, काही वेळेस ही क्रमवारी उलटी होताना दिसते. सध्याच्या तांत्रिक विकासाच्या काळात अनेकदा आधीची पिढी नवीन पिढीकडून नवीन तंत्रज्ञान शिकताना दिसते. त्याचबरोबर काही वेळेस संस्कृतीचे हस्तांतरण समस्तरीय पिढीकडे होताना दिसते. उदा., अनेकदा आपल्या समवयस्काकडून पेहरावाच्या पद्धती, राजकीय विचार इत्यादींच्या देवाण-घेवाणीतून संस्कृतीचे हस्तांतरण होते. बहुतांशी वेळेस हे हस्तांतरण कळत नकळत होत असते.

**७. संस्कृतीमध्ये सतत परिवर्तन होत असते :** संस्कृतीमध्ये सतत बदल घडत असतात. बदलत्या काळानुसार काही श्रद्धा, परंपरा, रूढी, मागे टाकल्या जातात व नवीन पद्धती अंगीकारल्या जातात. भाषा व शिष्टाचार यांत बदल होताना दिसतात. उदा., व्हॉटस् ॲप वरून संदेश द्यायला लागल्यापासून इंग्रजी भाषेमध्ये खूप बदल होताना दिसतात. तसेच मोबाइलच्या वापरामुळे पूर्वापार चालत आलेल्या संवादासंबंधीच्या शिष्टाचारात बदल होताना दिसतात. आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर स्थलांतर आणि जागतिकीकरणाचा देखील संस्कृतीवर परिणाम होताना दिसतो. जेव्हा जगभरातील व्यक्ती एकत्र येतात तेव्हा त्याचा एकमेकांच्या संस्कृतीवर परिणाम होऊन नवीन बहू संस्कृती निर्माण होते. त्याचबरोबर आधुनिक शिक्षण व ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्यामुळे व्यक्तींचा दृष्टिकोन अधिक व्यापक होतो. जुन्या चालीरिती व परंपराचा ताठरपणा कमी होऊन त्यात बदल घडून येतात.

जरी संस्कृतीमध्ये सतत परिवर्तन होत असले तरी परिवर्तनाची गती प्रत्येक संस्कृतीसाठी वेगवेगळी असते.

**८. समाजपरत्वे संस्कृती बदलते :** प्रत्येक समाजाची स्वतःची अशी संस्कृती असते. त्यातील मूल्ये,

परंपरा, रूढी, विचारप्रणाली, धर्म, श्रद्धा, पद्धती एका संस्कृतीसाठी समान असल्या तरी इतर संस्कृतीपेक्षा वेगळ्या असतात. खानपान, बोलण्याच्या पद्धती, शिष्टाचार, स्वागतपद्धती पोशाखाच्या पद्धती या त्या त्या सामाजिक परिस्थितीतून बदलत असतात.

९. **संस्कृती ही एकात्मक असते :** संस्कृतीचे विविध घटक हे परस्परपूरक, परस्पर संबंधित व एकात्मक स्वरूपाचे असतात. उदा., एखाद्या समाजातील मूल्य व्यवस्था ही त्या समाजातील नैतिकता, धर्म, रूढी, परंपरा, श्रद्धा इत्यादी सांस्कृतिक पैलूंशी घनिष्ठपणे जोडलेल्या असतात.

१०. **भाषा ही संस्कृतीचे प्रमुख वाहक आहे :** आपण केवळ वर्तमानातच नाही तर भूत व भविष्यकाळातही वावरत असतो. भूतकाळात शिकलेल्या गोष्टी पुढे आणण्यासाठी भाषा मदत करते. प्रत्येक संस्कृतीची विशिष्ट अशी भाषा असते व त्या संस्कृतीतील सर्व सदस्यांना ती भाषा अवगत असते. इतर अनेक मार्गांनी संस्कृतीचे हस्तांतरण होत असले तरी भाषा हे एक प्रमुख माध्यम आहे की ज्यांच्यामार्फत संस्कृतीचे हस्तांतरण मोठ्या प्रमाणावर होत असते.

## ५.५ संस्कृतीचे महत्त्व

संस्कृती ही कोणत्याही जिवंत समाजाचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. बहुतांशी वेळेस ते आपल्या पौराणिक कथांमधून, चित्र, शिल्प, संगीत अशा अनेक कला प्रकारांमधून व्यक्त केले जाते. ते आपण ज्या पद्धतीने आपला इतिहास साजरा करतो किंवा इतिहासाचे ज्या पद्धतीने स्मरण करतो किंवा ज्या पद्धतीने आपल्या भविष्यकाळाचा विचार करतो त्यातून देखील व्यक्त होत असते. याचबरोबर संस्कृतीचे काही सामाजिक आणि आर्थिक फायदेदेखील आहेत.

## संस्कृतीचे वैयक्तिक आणि सामाजिक फायदे

१. **मूलभूत फायदा :** संस्कृतीचा सदस्य म्हणून व्यक्तींना अनेक फायदे मिळतात. संस्कृतीमुळे भावनिकदृष्ट्या आणि बौद्धिकदृष्ट्या सक्षम होण्यास अनुभव मिळतात. व्यक्तीमधील सर्जनशीलता व्यक्त होण्यासाठी संस्कृती मदत करते. तसेच व्यक्तींची अस्मिता निर्माण करण्यामध्ये देखील मदत करते. यामुळेच आपण आपल्या संस्कृतीकडे आकर्षित होतो आणि त्याचा सदस्य म्हणून त्यात सहभागी होतो.

२. **भविष्यात उपयोगी येणारी नवीन कौशल्ये आणि नवीन गोष्टी शिकण्याच्या संधी :** लहान मुले व युवक एखाद्या विशिष्ट संस्कृतीचे सभासद म्हणून नवीन कौशल्ये शिकतात. याचबरोबर त्यांची अस्मिता आणि संवेदनक्षमता देखील संस्कृतीच्या माध्यमातून विकसित होत असते. यातून शिकण्याची क्षमता वाढताना दिसते. आपण संस्कृती आणि शैक्षणिक क्षमता आणि शैक्षणिक विकास यांमध्ये परस्परसंबंध लावू शकतो. ज्या संस्कृतीमध्ये नवनवीन कौशल्ये आणि शिक्षणाला प्राधान्य दिलेले असते त्या समाजामध्ये आपल्याला सदस्यांची शैक्षणिक पातळी आणि व्यावसायिक क्षमता जास्त आहे असे दिसते. समृद्ध सांस्कृतिक वारसा असणाऱ्या समाजामध्ये अधिक विस्तृत स्वरूपाच्या शैक्षणिक संधी उपलब्ध असतात.

३. **सामाजिक स्वास्थ्य आणि हित :** समृद्ध संस्कृती असलेल्या समाजातील सदस्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य समृद्ध असते, असे अनेक ठिकाणी दिसून आले आहे. सध्याच्या विविध संशोधनांच्या निष्कर्षानुसार वेगवेगळ्या संगीत, नाटक यांसारख्या सांस्कृतिक कलांमध्ये भाग घेतल्याने समाजातील सभासदांचे मानसिक/ शारीरिक स्वास्थ्य चांगले राहते. अशा कलांमुळे व्यक्तीचा एकटेपणा कमी होतो. तसेच या कला आपली ओळख निर्माण करण्यात व्यक्तींना मदत

करतात आणि या कलांच्या मार्फत इतर समाजामधील संस्कृतीची देखील ओळख व्यक्तींना होते.

**४. सामाजिक एकात्मकता आणि एकरूपता :** संस्कृतीचे फायदे केवळ व्यक्तिगत नसून त्याचे फायदे संपूर्ण समाजाला देखील होतात. संस्कृतीतूनच सांस्कृतिक भांडवलाची निर्मिती होते व त्यातून समाज एकत्र बांधला जातो. जत्रा, सण-समारंभ यांसारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांमधून त्या संस्कृतीतील सदस्य एकत्र येतात व समाजात एकात्मता निर्माण होते. यातूनच पुढे सामाजिक समावेशकता, समुदायाचे सक्षमीकरण आणि सहिष्णुता वाढीस लागते. थोडक्यात समाजातील चैतन्य टिकवून ठेवण्यासाठी संस्कृती आवश्यक असते. अनेकदा सांस्कृतिक कार्यक्रमांच्या मार्फत तयार झालेली सामाजिक संपर्काची जाळी आर्थिक व्यवहारांमध्ये देखील उपयोगी पडतात. एखाद्या समाजातील वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारशातून सभासदांना समृद्ध भूतकाळाचे आकलन होते व त्यातून त्यांच्यामध्ये गौरवाची भावना निर्माण होते. यातूनच सभासदांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण होते.

**हे जाणून घ्या.**

पर्यटन क्षेत्राच्या वाढीमध्ये संस्कृतीचे योगदान महत्त्वपूर्ण असते. पर्यटन क्षेत्राचा विकास झाला की नवीन व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतात. तसेच पायाभूत सुविधांचा विकास होतो. विविध प्रदेशांमध्ये दरवर्षी साजरे केले जाणारे सण तसेच तेथील संग्रहालये, कलादालने, ऐतिहासिक वास्तू याचे पर्यटकांना प्रचंड आकर्षण असते. बऱ्याचदा सांस्कृतिक वारशाविषयी जाहिरात करून सांस्कृतिक पर्यटन वाढवले जाते. उदा., ताजमहाल, चारमिनार, कुतुबमिनार, लालकिल्ला, काशीविश्वेश्वर, कन्याकुमारी, वेगवेगळे गड अशी ठिकाणे पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहेत. उदा., राजस्थानमधील वेगवेगळे महाल, संगीत, राजपुत योद्ध्यांचा इतिहास हे सर्व राजस्थानमधील सांस्कृतिक पर्यटन वाढीस लागण्यास कारणीभूत झालेले दिसते.

## ५.६ स्वसमूह श्रेष्ठतावाद/स्वसंस्कृती श्रेष्ठतावाद

स्वसमूह श्रेष्ठतावाद म्हणजे इतरांच्या संस्कृतीपेक्षा आपली स्वतःची संस्कृती अधिक श्रेष्ठ आहे असा समज होय. यामध्ये स्वतःच्या दृष्टिकोनातून इतर संस्कृतींचे मूल्यमापन केले जाते. १९०६ मध्ये विलियम ग्रॅहम समनर यांनी पहिल्यांदा स्वसमूह श्रेष्ठतावाद ही संकल्पना मांडली. एखाद्या विशिष्ट संस्कृतीमधील सदस्यांची जीवनशैली आणि संस्कृती ही इतरांपेक्षा श्रेष्ठ मानण्याची प्रवृत्ती म्हणजे स्वसमूह श्रेष्ठतावाद होय. यामध्ये केवळ स्व संस्कृतीलाच महत्त्व दिले जाते व आपल्या संस्कृतीच्या संदर्भातच इतर संस्कृतींचे मूल्यमापन केले जाते. स्वतःची संस्कृती प्रमाणित मानल्याने इतर संस्कृतींचे मूळ संस्कृतीपासून विचलन झाले आहे. यांसारखे गैरसमजदेखील स्वसमूह श्रेष्ठतावादामुळे होतात. असे असले तरी स्वसमूह श्रेष्ठतावाद प्रत्येक संस्कृतीचे वैशिष्ट्य बनले आहे. असे अनेक समाजशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

काही सामाजिक शास्त्रज्ञांच्या मते, स्वसमूह श्रेष्ठतावादामुळे दुसऱ्या संस्कृती समजून घेण्यामध्ये पूर्वग्रह निर्माण होऊ शकतात. संघर्षवादी विचारवंतांच्या मते, स्वसमूह श्रेष्ठतावादामुळे समाजामध्ये व्यक्तींना समान संधी नाकारल्या जातात. तरी याउलट, कार्यवादी विचारवंतांच्या मते, स्वसमूह श्रेष्ठतावाद सामाजिक एकात्मतेसाठी पूरक ठरतो. उदा., दुसऱ्या संस्कृतीला कमी लेखण्याच्या नादात स्वतःच्या संस्कृतीविषयीचा अभिमान त्या त्या संस्कृतीच्या सदस्यांमध्ये वाढीस लागतो.

थोडक्यात, स्वसमूह श्रेष्ठतावाद सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजू असतात. आपल्यापेक्षा अधिक श्रेष्ठ संस्कृतीमधून आपल्याला जे ज्ञान मिळू शकते ते स्वसमूह श्रेष्ठतावादाच्या भावनेतून मिळत नाही. तसेच व्यक्ती उद्धट होण्याची शक्यता असते. या त्याच्या नकारात्मक बाजू आहेत.

तर आपल्या संस्कृतीविषयी अभिमान असणे यातून एक प्रकारचा आत्मविश्वास आणि दिलासा मिळतो. तसेच गट एकत्र बांधलेला राहतो, या त्याच्या सकारात्मक बाजू आहेत.

## ५.७ संस्कृतीचे संकरीकरण

एखाद्या संस्कृतीमधील एका भागातील पद्धतींचे दुसऱ्या संस्कृतीमधील एखाद्या भागाशी सरमिसळ होते त्याला सांस्कृतिक संकरण असे म्हणतात. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये विविध सांस्कृतिक परंपरांचे मिश्रण झाल्याने नवीन सांस्कृतिक आचार आणि वर्तनपद्धती उदयास येतात. आपली संस्कृती पूर्णच न नाकारता इतर संस्कृतीमधून आपल्या आवडीनुसार आणि सोईनुसार काही घटक निवडून आपल्या संस्कृतीत त्याची बेमालूम सरमिसळ करणे शक्य होते व यातूनच एक पूर्णतः वेगळी, नवीन आणि वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती उदयास येते. यालाच संस्कृतीचे संकरीकरण असे म्हणतात. ही संकरीकरणाची प्रक्रिया सार्वत्रिक असून जागतिकीकरणामुळे हे अधिक जलद गतीने होताना दिसते. जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये मानवी समुहांमध्ये विविधता निर्माण होताना दिसते. जागतिक पातळीवर होणारे स्थलांतर, माहिती तंत्रज्ञान, जागतिक आर्थिक उलाढाल, वाढता आचार-विचारांचा विनिमय यातून वेगवेगळे समाज मोठ्या प्रमाणावर एकमेकांवर अवलंबून असतात व यातूनच संस्कृतीचे संकरण होते. यातून नवीन रोमांचक सांस्कृतिक अनुभवनिर्मिती होते. खानपान, भाषा, लग्नपद्धती, वेषभूषा या सगळ्यामध्ये संकरित संस्कृती दिसते. उदा., इटालियन पिझ्झावर तंदूर पनीरचे मिश्रण हे सांस्कृतिक संकरीकरणाचेच एक उदाहरण आहे. व्हॅलेंटाईन साजरा करणे, भाषेची सरमिसळ, फ्यूजन संगीत ही सांस्कृतिक संकरीकरणाची आणखी काही उदाहरणे आहेत.

सांस्कृतिक संकरीकरण समजून घेण्यासाठी 'ग्लोकलायझेशन' ही संकल्पना समजून घेतली पाहिजे. यामध्ये जागतिक पातळीवरील प्रक्रियांचे स्थानिक पातळीवरील प्रक्रियांबरोबर मिश्रण होते. जागतिक पातळीवर असणाऱ्या पद्धतींना स्थानिक पद्धतींची जोड दिली जाते. उदा., जागतिक पातळीवरील खाण्याची ठिकाणे जेव्हा इतर देशांमध्ये व्यवसायानिमित्ताने स्थिरावतात तेव्हा त्या त्या देशातील स्थानिक आवडी-निवडीनुसार बदल केले जातात. तरच त्यांना नवीन देशात स्थिरावायला मदत होते. उदा., मॅकडोनाल्डच्या बर्गर मेनूमध्ये स्थानिक आवडी-निवडीनुसार केलेले बदल, चायनीज पदार्थांचे भारतीयीकरण होणे इत्यादी.

### हे तुम्हांला माहीत आहे का?

**ग्लोकलायझेशन**

ग्लोकलायझेशन ही संकल्पना इंग्रजीमधील ग्लोबलायझेशन आणि लोकलायझेशन या दोन संकल्पना मिळून तयार झाली आहे. जागतिक पातळीवर उत्पादित केलेल्या वस्तू व सेवा जेव्हा जगभर स्थलांतरित होतात तेव्हा त्या त्या स्थानिक संस्कृतीमुळे त्यामध्ये बदल केले जातात. त्या प्रक्रियेला उद्देशून ग्लोकलायझेशन ही संकल्पना वापरली जाते. ही संकल्पना १९८० मध्ये प्रामुख्याने वापरली गेली. १९८० च्या हार्वर्ड बिझीनेस रिव्ह्यूमध्ये ही संकल्पना पहिल्यांदा रोलँड रॉबर्टसन या समाजशास्त्रज्ञाने मांडली. यामध्ये एखाद्या प्रक्रियेचे सार्वत्रिकीकरण आणि स्थानिकीकरण या दोन्हींची एकाच वेळेस सांगड घातली जाते.



बर्गर



संकरित रूपातील बार्बी

संस्कृती ही सर्वसमावेशक आहे. आपण जो विचार करतो, मत बनवतो आणि आचरण करतो त्या सर्वांवर संस्कृतीचा प्रभाव असतो. तुम्हांला आता समाजाचे सदस्य म्हणून आपल्या जगण्यावर प्रभाव टाकणारे संस्कृतीचे विविध पैलू माहीत झाले असतील. सांस्कृतिक वैविध्याचे आणि संक्रमणाचे महत्त्व ओळखून त्याबरोबर येणाऱ्या सांस्कृतिक आव्हानांचे आकलनही तुम्हांला नक्की झाले असेल.

**उपक्रम – ३**

तुमच्या भोवतालच्या परिस्थितीचे निरीक्षण करा आणि खाद्यपदार्थ, खेळणी, धार्मिक प्रथा, सण–समारंभ अशा विविध क्षेत्रांत दिसणाऱ्या संकरीकरणाच्या उदाहरणांची यादी करा.

## सारांश

- संस्कृती ही संकल्पना समाजशास्त्रात आणि दैनंदिन जीवनात विविध अर्थांनी वापरली जाते.
- जीवन जगण्याचा मार्ग आणि सामाजीकरणाच्या मार्फत शिकलेली जीवनपद्धती असा संस्कृतीचा सर्वमान्य अर्थ होय.
- प्रमाणित वर्तन पद्धती अंगीकरणाचा संस्कृती हे प्रमुख माध्यम आहे.
- संस्कृतीचे दोन प्रकारांत विभाजन होते. भौतिक संस्कृती आणि अभौतिक संस्कृती.
- भौतिक संस्कृतीमध्ये मानवनिर्मित ठोस/भरीव आणि मूर्त गोष्टींचा समावेश होतो.
- अभौतिक संस्कृतीमध्ये मानवनिर्मित विचारधारा तसेच इतर अमूर्त आणि अप्रकट गोष्टींचा समावेश होतो.
- संस्कृती ही प्रतीके, चिन्हे, मूल्य, श्रद्धा, प्रमाणके, भाषा व ज्ञान यांनी बनलेली असते.
- संस्कृती ही नैसर्गिक नसून ती सामाजीकरणाच्या प्रक्रियेमार्फत त्या त्या संस्कृतीच्या सदस्यांना शिकवली जाते. म्हणून संस्कृती मानवनिर्मित आहे.
- संस्कृती ही आदर्श स्वरूप असून त्या त्या समाजातील आदर्श पद्धती व प्रमाणकांची गोळाबेरीज असते.
- संस्कृती ही गतिशील असते. संस्कृतीमध्ये सतत बदल होत असतात. बदलत्या काळानुसार त्या त्या समाजातील श्रद्धा, परंपरा, रूढी बदलत जातात. काही मागे पडतात, भाषेमध्ये तसेच शिष्टाचारात बदल होतात आणि त्यामुळे संस्कृतीमध्ये देखील बदल होतात.
- प्रत्येक समाजाला स्वतःची अशी एक संस्कृती असते व वर्तन पद्धती असते. त्या त्या संस्कृतीमधील सदस्यांसाठी ती समान असली तरी संस्कृतीनुसार ही वर्तनपद्धती बदलत जाते.

- भाषा ही कोणत्याही संस्कृतीची प्रमुख वाहक असते.
- संस्कृतीचे सभासद म्हणून व्यक्तींना त्याचे अनेक फायदे होत असतात. तसेच समाजात देखील सामाजिक एकात्मता आणि एकरूपता वाढते.
- प्रत्येक संस्कृतीमध्ये स्वसमूह श्रेष्ठतावाद दिसतो. आपलीच संस्कृती श्रेष्ठ अशी भावना म्हणजे स्वसमूह श्रेष्ठतावाद होय.
- जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये विविध संस्कृतींमधील काही भाग सोईनुसार आणि आवडीनुसार एकत्र जोडले जातात व एक नवीन संस्कृती उदयास येते. यालाच सांस्कृतिक संकरीकरण असे म्हणतात.

## स्वाध्याय

**प्र.१(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. संस्कृती ही ............ असते.
(नैसर्गिक, वैयक्तिक, अनुकूलनीय)

२. भौतिक संस्कृती ............ असते.
(मूर्त, वस्तुनिष्ठ, अमूर्त)

३. बॉलिवूड संगीत ........... चे उदाहरण आहे.
(उच्च संस्कृती, लोकप्रिय संस्कृती, लोक संस्कृती)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) भीमसेन जोशी यांचे गायन – उच्च संस्कृती
(ii) शेक्सपिअरचे साहित्य – लोक संस्कृती
(iii) हॅरी पॉटर कादंबरी – लोकप्रिय संस्कृती
(iv) धार्मिक गट – उपसंस्कृती

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| भौतिक संस्कृती, लोक संस्कृती, लोकप्रिय संस्कृती |
|---|

१. गायन कला एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होणे.

२. आजच्या काळात मोबाईलचा वापर.

**(ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

१. अंधश्रद्धेवर विश्वास ठेवणे हे भौतिक संस्कृतीचे उदाहरण आहे.

२. ई-व्यापार हे लोकप्रिय संस्कृतीचे उदाहरण आहे.

**प्र.२(अ) दिलेल्या संकल्पनेचे योग्य उदाहरण लिहा व तुमच्या उत्तराचे समर्थन करा.**

१. सांस्कृतिक संकरण

२. स्वसंस्कृती श्रेष्ठतावाद

**(ब) टीपा लिहा.**

१. संस्कृतीची वैशिष्ट्ये

२. संस्कृतीचे सामाजिक फायदे

**प्र.३ फरक स्पष्ट करा.**

१. भौतिक संस्कृती आणि अभौतिक संस्कृती


२. लोकरिती आणि लोकनीती

**प्र.४ खालील संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

१. उपसंस्कृती

२. लोकसंस्कृती

**प्र.५ पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**



**प्र.६ आपले मत नोंदवा.**

१. आजच्या काळात शास्त्रीय संगीत शिकण्याचा प्रयत्न खूप कमी लोक करतात.

२. अंधश्रद्धेचा त्याग करणे सोपे नाही/सहज शक्य होत नाही.

**उपक्रम**

वर्गातील प्रत्येकी ५/७ विद्यार्थी-विद्यार्थिनींचे गट करून कोणत्याही एका भारतीय राज्यातील संस्कृतीचे सादरीकरण (PPT मार्फत) करा. यामध्ये भाषा, वेशभूषा, नृत्य, संगीत, कथा, खानपान पद्धती, साहित्य यासारख्या सर्व घटकांचा समावेश करा.

***